# प्रस्तावना

# प्रस्तावना

'राजर्षी शाहूंच्या प्रशासकीय सुधारणा' हा विषय एम.फिलच्या शोध प्रबंधासाठी निवडलेला आहे. त्यासाठी निश्चित उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्यादृष्टीने अभ्यासाची दिशा निश्चित केलेली आहे.

थोर समाजसुधारक, मुत्सद्दी राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ म्हणून शाहूंच्या जीवनावर मोठ्या प्रमाणावर लिखाण झालेले आहे. शाहूंच्या या गुण वैशिष्ट्यांपैकी एक गुण वैशिष्ट्य म्हणजे छत्रपती शाहू हे एक आदर्श प्रशासक होते. महाराजांचा हा गुण तसा उपेक्षितच राहिला आहे. त्यामुळे एक आदर्श व मुरब्बी प्रशासक म्हणून शाहूंच्या कार्याची दखल या शोध प्रबंधाच्या माध्यमातून घेण्यात आली आहे.

वयाच्या विसाव्या वर्षी २ एप्रिल १८९४ च्या राज्यारोहण समारंभानंतर छत्रपती शाहूंकडे राज्यकारभाराची सुत्रे आली. शाहू महाराजांच्या देखरेखीखाली जेंव्हा प्रत्यक्ष राज्यकारभाराला सुरूवात झाली. तेंव्हा प्रशासनात ब्राम्हण, पारशी, युरोपियन अशा विशिष्ट वर्गाचेच प्रशासनावरती निर्माण झालेले प्रभूत्व त्यांच्या दृष्टीस आले.

स्वत:कडे असणाऱ्या अधिकारांच्या आणि सत्तेच्या जोरावर हे लोक राज्यातील बहुसंख्य लोकांवर अन्याय, अत्याचार करत होते. कोणतेही कार्य करत असताना हे लोक धुर्त, कावेबाजपणे आपला हेतू साध्य करून घेत. स्वार्थी बुद्धीने फक्त स्वहिताचाच विचार करत.

महाराजांनी हे सर्व लक्षात घेऊन सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्यांचा उद्धार करण्यासाठी प्रशासकीय कार्य केले. प्रशासकीय व्यवस्थेत विविध घटकांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी शाहूंनी सुधारणा घडवून आणल्या. प्रशासनात समतोल निर्माण व्हावा यासाठी राखीव जागांचे धोरण अवलंबिले.

प्रशासनातून भ्रष्टाचार दूर व्हावा यासाठी विविध उपाययोजना केल्या. जातीयवादी तत्वांना प्रशासनापासून दूर भिरकावून दिले. समाजातील उच्चवर्गीय स्वत:कडे असणाऱ्या हुद्याच्या, अधिकारांच्या जोरावर सामान्य माणसांना लुबाडत होती. अशा मंडळीच्या विरोधात शाहू उभे राहिले.

प्रशासनात कार्यक्षमता, शिस्त, कर्तव्यनिष्ठता निर्माण व्हावी यासाठी शाहूंना विविध निर्बंध तयार केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या प्रशासकीय कार्यपद्धतीच्या माध्यमातून प्रशासनाचा एक आदर्श घालून दिला. छत्रपती शाहू महाराज हे एक थोर समाजसुधारक व प्रशासक तर होतेच शिवाय थोर राजे होते. त्यामुळे प्रस्तुत शोध प्रबंधास अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

१. शाहूकालीन समाज व्यवस्थेत व्यावहारिक जीवनपद्धती कशी होती याचा आढावा घेणे.

२. शाहूंचे राजकीय व शैक्षणिक विचार समाजावून घेणे.

३. शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करणे.

४. शाहूंची प्रशासकीय कार्यपद्धती समजावून घेणे.

५. शाहू महाराजांच्या प्रशासकीय सुधारणांच्या कार्याचे विश्लेषण करणे.

## संशोधन पद्धती :

या अभ्यासासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करणे आणि अभ्यास पद्धतीमध्ये वर्गीकरण व विश्लेषण यांचा उपयोग केला गेला आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साधनसामुग्री उपयोगात आणलेली आहे. संकलित वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न प्रस्तूत संशोधनात करण्यात आलेला आहे.

## व्याप्ती आणि मर्यादा :

राजर्षी शाहूंनी संस्थानात केलेल्या विविध सुधारणांचां आढावा घेणे यासाठी उपलब्ध साधन सामुग्रीचे काळजीपूर्वक अध्ययन करून शाहू महाराजांच्या

प्रशासकीय सुधारणा कार्याचे अध्ययन करणे एवढ्यापुरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

**महत्त्व :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून राज्यकारभार केला. मागासलेल्या समाजाला प्रगत समाजाच्या बरोबरीने आणणे हा प्रामुख्याने त्यांच्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू होता.

प्रशासकीय कार्याच्या व सुधारणेच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज यांनी पिढ्यान्-पिढ्या सामाजिक, धार्मिक गुलामगिरीच्या, वर्णव्यवस्थेच्या जोखडात अडकून पडलेल्या बहुजन समाजातील सर्वसामान्य तसेच तळागळातील लोकांना मुक्तीचा मार्ग दाखविला.

सुमारे १०० वर्षापुर्वी छत्रपती शाहूंनी केलेल्या प्रशासकीय सुधारणांचे महत्त्व आजच्या काळातही तितकेच महत्त्वाचे आहे. शाहूंच्या या कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन आधुनिक काळातील विविध प्रशासकीय, सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो.

तसेच ऐतिहासिक वाचनाची गोडी या संशोधनाच्या माध्यमातून निर्माण होते. शैक्षणिक वारसा, परंपरा, लोकशाही मूल्याचे महत्त्व आणि विकास समजून घेण्यामध्ये हे अध्ययन महत्त्वाचे ठरते.

शाहू महाराजांचे राजकीय, प्रशासकीय सुधारणा समजून घेण्यासाठी राज्यशास्त्रातंर्गत राजकीय विचारांच्या अभ्यासात या संशोधनाचे विशेष महत्त्व आहे. मानवी मूल्यांचे अध्ययन होण्याच्या दृष्टीने देखील हे संशोधन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

जूलमी राजकीय व्यवस्थेतून आणि अन्यायी सामाजिक व्यवस्थेतून मानव मुक्तीचा विचार या संशोधनातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

भारतीय सामाजिक व्यवस्थेमध्ये असलेल्या वर्णव्यवस्थेमध्ये आणि अन्यायी

सामाजिक व्यवस्थेतून मानवमुक्तीचा विचार या संशोधनातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

भारतीय सामाजिक व्यवस्थेमध्ये असलेल्या वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेच्या परंपरेला राजकीय सत्तेच्या माध्यमातून शह देऊन राजर्षी छत्रपती शाहूंनी केलेले कार्य ऐतिहासिक महत्त्वाचे असून ते क्रांतीकारक असल्याने या संशोधनातील विचार अन्य संशोधकांना मार्गदर्शक ठरण्याइतके महत्त्व या संशोधनातून प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.